तिल्लारी प्रकल्पास निधी वाटपाबाबत....
(लेखाशिर्ष-२२१५ ए०३२)

महाराष्ट्र शासन

पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

शासन निर्णय क्रमांकः क्र.राग्रापे-२०१९ / प्र.क्र.७३ /पापु-१०

७ वा मजला, गोकुलदास तेजपाल रुग्णालय इमारत संकुल,
लोकमान्य टिळक मार्ग,क्रॉफर्ड मार्केट, नवीन मंत्रालय, मुंबई-४०० ००१
तारीख: १९ जुलै, २०१९

वाचा -

१) शासन निर्णय क्रमांकःक्र. ग्रापापु-१४०९/प्र.क्र.१४८/पापु-६,दिनांक ०१.०६.२०११

२) शासन निर्णय क्रमांकःक्र. ग्रापापु-१४१८/प्र.क्र.९४/पापु-६,दिनांक २८.०३.२०१९

३) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे पत्र क्र.मजीप्रा/वित्त-२/निधी-९२ ,दिनांक ०६.०७.२०१९

प्रस्तावना -

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील तिल्लारी प्रकल्पावर आधारित १८ गावे, वेंगुर्ला शहर व मार्गस्थ औद्योगिक क्षेत्र तसेच पर्यटन स्थळासाठी पाणी पुरवठा योजनेस संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयान्वये रु. २१६.३७ कोटी (ढोबळ) इतक्या किंमीच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. सदर प्रकल्पातील मे. उत्तम स्टील यांना वगळण्यात आल्याने संदर्भ क्र. २ येथील शासन निर्णयान्वये तिल्लारी प्रकल्पावर लेखाशिर्ष २२१५ ए०३२ अंतर्गत रु. १५९.४० कोटी इतका खर्च करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. सदंर्भ क्र.३ वरील पत्रान्वये मजीप्राने रु. १०.०० कोटीची मागणी केली आहे. यास्तव, तिल्लारी प्रकल्पाकरिता रु.८.५० कोटी इतका उपलब्ध निधी वाटपाचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासननिर्णय-

तिल्लारी प्रकल्पाकरिता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिंधुदुर्ग यांना पुर्ण करण्यात आलेल्या कामाकरिता रु.८.५० कोटी इतका निधी संदर्भ क्र.१ व २ मधील शासन निर्णयात नमूद करण्यात आलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहून मंजूर व मुक्त करण्यात येत आहे.

२. या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई यांना मुक्त करण्यात आलेला निधी रु. ८.५० कोटी (रुपये आठ कोटी पन्नास लक्ष फ़क्त)) बाबत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे संचालक (वित्त), (श्री. यशवंत बाबुराव पाटील) यांच्या स्वाक्षरीने तयार केलेले व अवर सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, (श्री.व.भि.माने) यांनी प्रतिस्वाक्षरीत केलेले देयक अधिदान व लेखा अधिकारी कार्यालय, मुंबई यांना सादर करण्यात यावे. संचालक (वित्त), (श्री. यशवंत बाबुराव पाटील) यांना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. तसेच अवर सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, (श्री.व.भि.माने) यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. सदर रक्कम एनईएफटी (NEFT) प्रणालीद्वारे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्या खाती जमा करण्यात यावी.

३. या योजनेवर होणारा खर्च सन २०१९-२० मध्ये मागणी क्र. वाय-२, २२१५ पाणी पुरवठा व स्वच्छता, ०१ पाणी पुरवठा, १९६ जिल्हा परिषदांना सहाय्य, (०२) जिल्हा परिषदांना योजनांतर्गत अनुदाने, (०२) (०२) तिलारी प्रकल्पावर आधिारित पाणी पुरवठा योजना(कार्यक्रम), सहायक अनुदान (२२१५ ए०३२)-३१, सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर) या लेखाशिर्षाखालील मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा व त्याखाली अंतिमत: खर्ची टाकण्यात यावा

४. हा शासन निर्णय वित्त विभागाचे परिपत्रक क्र. अर्थसं-२०१९/प्र.क्र.९२/अर्थ-३, दिनांक ०८/०७/२०१९ अन्वये या विभागास प्रदान केलेल्या अधिकारात तसेच सदर परिपत्रकातील अटी व शर्तीच्या अधीन राहून मुक्त करण्यात येत आहे. सदर परिपत्रकामधील तसेच परिपत्रकासोबतच्या परिशिष्टातील अनुक्रमांक १ ते ९ व क्र. ९ मधील तपासणी सूचीतील अनुक्रमांक १ ते १० मधील अटी व शर्तीची पुर्तता होत असल्याचे प्रमाणित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.inया संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०७१९१२०४५७८३२८असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

VASANT BHIMRAO MANE

Digitally signed by VASANT BHIMRAO MANE
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=280e2beac20f526041fee94f6226522e1407a7f6aa0b06c8769634d48c2976bc, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, ou=NA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=VASANT BHIMRAO MANE
Date: 2019.07.19 14:39:04 +05'30'

(वसंत भि. माने)

अवर सचिव , महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महालेखापाल, लेखा परीक्षा, महाराष्ट्र -१ मुंबई.
२. महालेखापाल, लेखा परीक्षा, महाराष्ट्र -२ नागपूर.
३. मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांचे खाजगी सचिव, मंत्रालय मुंबई.
४. मा.राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांचे खाजगी सचिव, मंत्रालय मुंबई.
५. मा.विधानमंडळ सदस्य (सर्व).
६. मा.प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय मुंबई.
७. अपर मुख्य सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय मुंबई
८. अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय मुंबई.
९. मुख्य अभियंता तथा विशेष कार्य अधिकारी, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, मंबई.

१०.सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई

११.मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.

१२.विभागीय आयुक्त, कोकण विभाग

१३.जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग

१४. उप सचिव तथा नियंत्रण अधिकारी, (रोख शाखा) पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय मुंबई.

१५. संचालक, पाणी व स्वच्छता सहाय संस्था,(वासो) बेलापूर, नवी मुंबई.

१६. अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण , सिंधुदुर्ग .

१७. संचालक (वित्त), तथा आहरण संवितरण अधिकारी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको भवन, नवी मुंबई.

१८. उपसंचालक भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा, सिंधुदुर्ग,

१९. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग,

२०. कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिंधुदुर्ग,

२१. कक्ष अधिकारी, नियोजन विभाग (का-१४४३) वित्त विभाग(व्यय-३) मंत्रालय मुंबई.

२२. कक्ष अधिकारी, कार्यासन (पापु-०४,०६,०७,१७,१८,१३, व २०) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय मुंबई.

२३. निवडनस्ती (पापु-१०)